# ॥ श्री नंदामाई पाठ ॥

नंदामाई म्हणा नंदामाई म्हणा । हीच विश्वमाता चिदानंदा ॥
श्रीविश्वलोचन चक्रराज सांगे । आईचिया मार्गे पावे भक्ति ॥
महाप्राणजोत प्रकाशी हे सत्य । श्रीमाता ही नित्य महाशक्ती ॥
पूर्णा आल्हादिनी अनिरुद्धरमणी । ललिता संधिनी नंदामाई ॥१॥
नंदामाई म्हणा नंदामाई म्हणा । हीच विश्वमाता चिदानंदा ॥
कुणी म्हणे कैसा माईचा हो पाठ । हरीचाचि पाठ असे लोकी ॥
परि जी विकासे बापुपाठपद्म । वरारोह नाम तिचे आम्हां ॥
आई हेचि नाम घेई बाळ आधी । याचि एका बोधी बोलू भाषा ॥
महाविष्णु जपे महाप्रज्ञानाम । गुरुतत्वी मर्म हे नामाचे ॥२॥
नंदामाई म्हणा नंदामाई म्हणा । हीच विश्वमाता चिदानंदा ॥
हिनेचि एकासी बहुत्वी आणीले । अव्यक्त व्यक्तले पतिप्रेमे ॥
बापुसवे खेळे रास ही अद्भुत । वेणी ही माळत त्रिगुणाची ॥
पंचभूत झाले चरणी पैजण । टिपऱ्या त्या दोन विद्या अविद्या ॥
ज्ञानिया ही माया भक्ता भोळी माई । भक्तिचि सवाई अनुभव ॥३॥
नंदामाई म्हणा नंदामाई म्हणा । हीच विश्वमाता चिदानंदा ॥
भक्तिच्या चरणी मुक्ती सिद्धी दासी । ऐश्वर्याच्या राशी सर्व निधी ॥
षोडश कलांची धात्री महातुला । स्वये चंद्रकला सतरावी ॥
निर्गुण सगुण खेळ मांडणारी । कर्ती करविती नंदामाई ॥
बापु खेळुनिया राही गे निराळा । सारी तुझी लीला चिदानंदे ॥४॥
नंदामाई म्हणा नंदामाई म्हणा । हीच विश्वमाता चिदानंदा ॥
ज्ञानिया संवित्ती योगियां चित्त-शक्ती । तीच नवभक्ती आम्हा माता ॥
स्वमुखे गोपाल देतो हीच ग्वाही । एक-भक्तिग्राही सर्वथा मी ॥
केवळ मी माझ्या भक्तीच्या अधीन । निश्चये श्रीकृष्ण सांगतसे ॥
आम्हा नको ज्ञान योग कर्म इतर । भक्तीचाच पदर धरू घट्ट ॥५॥
नंदामाई म्हणा नंदामाई म्हणा । हीच विश्वमाता चिदानंदा ॥
कारूण्यमहाघन कृपेचा सागरू । वात्सल्याचा मेरु तुचि माये ॥

तुज उपमीता थिटे शब्दब्रह्म । तुझेचि गे नाम तुज साजे ॥
वेदशास्त्रदर्शना पडे जेथ कोडे । नाम उलगडे तेथ दृष्टी ॥
बापुचे स्वरुप ना कोणा ठाऊक । नाम तुझे कीलक जाणण्यासी ॥६॥
नंदामाई म्हणा नंदामाई म्हणा । हीच विश्वमाता चिदानंदा ॥
सकल सर्वस्वी सारी आभूषणे । माईच्या धारणे शोभिन्तली ॥
वेद व वेदान्त बाजुबंद दोन । पुराणे कंकण गीता नथ ॥
भागवत गोफ ठुशी ज्ञानेश्वरी । गाथा गळसरी तिकोबाची ॥
एकादशतत्वी लेवुनी पैठणी । मयुरवाहनी नंदामाई ॥७॥
नंदामाई म्हणा नंदामाई म्हणा । हीच विश्वमाता चिदानंदा ॥
झाला कंठ शीतळ नामेचि शिवाचा । राम मंत्र त्याचा आवडीचा ॥
परि रामनामी हरीशक्तिबीज । अवघा तिचाच हारी हरी ॥
विठ्ठला आवडे रुक्मिणीचे नाम । सावळ्याचे नाम रखुमेसी ॥
बापुंच्या हृदयी चिदानंदा नाम । अद्‌भुतचि प्रेम परस्परे ॥८॥
नंदामाई म्हणा नंदामाई म्हणा । हीच विश्वमाता चिदानंदा ॥
सर्वावरी कृपाछत्र ही मायेचे । ऋण ना माईचे फिटणार ॥
हिच्या शिरी छत्र धरी हा सुचित । समर्थ हा भ्रात माझा दादा ॥
तोचि आम्हा सांगे नाम हिचे श्रेष्ठ । धारी तोच वाट देवयान ॥
दादासम नाही अनिरुद्धसेवक । अनंताचे मुख नाममय ॥९॥
नंदामाई म्हणा नंदामाई म्हणा । हीच विश्वमाता चिदानंदा ॥
माझे बापु आणि माझी माय नंदा । पिपा त्याचा बंदा भावु माझा ॥
सुचिताचा शिष्य चाले दादापाठी । नाम उरापोटी हेचि घेई ॥
चेतवी चलीसा सेवी नामरसा । उठे ती पिपासा नित्यतृप्ता ॥
पिपे सांगितली भाविकांसी सोई । नाम नंदामाई आल्हादक ॥१०॥
नंदामाई म्हणा नंदामाई म्हणा । हीच विश्वमाता चिदानंदा ॥
दिली भगीरथा प्रयत्नांची गंगा । पावे भक्तिरंगा चांगदेव ॥
आणिले तुक्यासी सदेह वैकुंठी । विठ्ठलाचे भेटी नेई भक्ता ॥
साईभगताची झाली एकाकृती । ऐसा म्हाळसापती लेक तीचा ॥

मातेच्या प्रसादे पिपासी पिपासा । भक्ति चिदाकाशा व्यापि नामॆ ॥११॥
नंदामाई म्हणा नंदामाई म्हणा । हीच विश्वमाता चिदानंदा ॥
नारदासी नित्य नामाचे कीर्तन । लक्ष्मीनारायण गर्जतसे ॥
व्यासांचे हृदयी रुक्मिणीरमण । कृष्णद्वैपायन झाले नामे ॥
उलट जपोनीही शुद्धभावे नाम । मिळे आत्माराम वाल्मीकिसी ॥
नाम हेचि एक उत्तम सोपान । नाही त्या बंधन प्रेमावीण ॥१२॥
नंदामाई म्हणा नंदामाई म्हणा । हीच विश्वमाता चिदानंदा ॥
आधी भक्ती मग भगवंत-नाम । जैसे सीताराम राधाकृष्ण ॥
शक्तिपूर्वकचि उच्चारिती शिव । उमामहादेव घेती नाम ॥
लीलाधारी गाई ललितेचे गुण । सर्वथा अभिन्न शिवशक्ती ।
उठाउठी गाता नंदाअनिरुद्ध । उमटे चिदानंद आपोआप ॥१३॥
नंदामाई म्हणा नंदामाई म्हणा । हीच विश्वमाता चिदानंदा ॥
नाम गुरुवाणी नाम पुष्करिणी । नाम विरहिणी गोपाळाची ॥
राधा राधा म्हणा व्याकुळ होउन । येईल धावुन कृष्णराणा ॥
सीतानाम प्रिय रामासी सर्वथा । विरह निमित्तां दावी लीला ॥
सीते सीते म्हणुनी विरहाने राम । घॆई हिचे नाम वनवासी ॥१४॥
नंदामाई म्हणा नंदामाई म्हणा । हीच विश्वमाता चिदानंदा ॥
नामे अनिरुद्ध-गतीने केशव । घेतो नित्य धाव भक्तांसाठी ॥
अनिरुद्धनामी अनिरुद्ध शक्ती । माय आमुची ती नंदामाई ॥
हीच भेटवीते भक्त-भगवंता । हिचे नाम घेता पूर्णप्राप्ती ॥
बापु माझा मंगेश नंदा शांतादुर्गा । तीच या श्रीरंगा धारणारी ॥१५॥
नंदामाई म्हणा नंदामाई म्हणा । हीच विश्वमाता चिदानंदा ॥
नंदामाईपाठ माझी सोपी वाट । धरिली मी वीट डोईवरी ॥
धणी न पुरे बा हिचे गुण गाता । परि न बोलता राहवेना ॥
पिपा म्हणे भक्ती ब्रह्माचे माहेर । भक्तीचे स्वरुप नंदामाई ॥
योग्या अनिरुद्धी माहेरीचे प्रेम । अवघे एक नाम नंदामाई ॥१६॥
नंदामाई म्हणा नंदामाई म्हणा । हीच विश्वमाता चिदानंदा ॥

नामाठायी ऎसी शक्ती जी अद्भुत । नाम कृपाहस्त श्रीमातेचा ॥
तिनेचि नामासी दिला ऎसा वर । निरंजनी घर बांधण्यासी ॥
मग ह्या माईचे नाम किती थोर । हेचि सर्वसार नवनीत ॥
आमुचे उचित आम्हां उमगले । नाम एक धरले नंदामाई ॥१७॥
नंदामाई म्हणा नंदामाई म्हणा । हीच विश्वमाता चिदानंदा ॥
नामाघरी जनी राही नामदासी । जनीची मिराशी पांडुरंग ॥
नामाची महती पटविण्या खाशी । नामयाची दासी झाली जनी ॥
रुक्मिणीची लेक थोरांहुनी थोर । आनंद विभोर नामापायी ॥
योग्या अनिरुद्धी जनी जनार्दन । सापडली खूण नंदानामी ॥१८॥
नंदामाई म्हणा नंदामाई म्हणा । हीच विश्वमाता चिदानंदा ॥
नामचि वेदान्त नामचि सीमान्त । हेचि गाती संत अभंगात ॥
नामचि उद्गीथ नाम भागवत । नाम महाज्योत सर्वांघटी ॥
नाम कृती आकृती प्रतापी उच्चार । नाम भु:भु:कार रामदूतां ॥
महाप्राणदेही नामावगाहन । जानकीजीवन अंतर्बाह्य ॥१९॥
नंदामाई म्हणा नंदामाई म्हणा । हीच विश्वमाता चिदानंदा ॥
हनुमत-चरण नाम शस्त्र अस्त्र । सखा मित्र मंत्र नामे भेटे ॥
नामे पापलय पथाचा उदय । नामे नष्ट भय भविकांचे ॥
नाम हीचि उदी रक्षिते संकटी । नाम घोर कष्टी उद्धारक ॥
नंदामाईनामे बाळे बाळवन्त । ठेविला कृतान्ता-माथी पाया ॥२०॥
नंदामाई म्हणा नंदामाई म्हणा । हीच विश्वमाता चिदानंदा ॥
ऎसे पाप नाही विदित त्रिकाळी । ज्यासी ना निर्दाळी नामगदा ॥
नाम शंखध्वनी अनाहत नाद । नाम हाचि छंद आनंदाचा ॥
नाम सुदर्शन छेदी अहंकार । विकासे सहस्रार नामपद्म ॥
नंदेची आयुधे अनिरुद्धाहाती । भक्तां उद्धरती नंदाईनामे ॥२१॥
नंदामाई म्हणा नंदामाई म्हणा । हीच विश्वमाता चिदानंदा ॥
नाम श्रद्धाधन विवेकदर्पण । देई शिकवण सबूरीची ॥
गायीपाशी वत्स जैसे धावू जाय । तैसेचि वैराग्य नामाठायी ॥

नामे सत्प्रवृत्ती सोपा परमार्थ । पंच पुरुषार्थ नामे सिद्ध ॥
नंदानामी सारे भक्तीचे वैभव । एकविध भाव नामापोटी ॥२२॥
नंदामाई म्हणा नंदामाई म्हणा । हीच विश्वमाता चिदानंदा ॥
देता ऍंशी जिला सहस्र ती देई । ऎसी नंदामाई अचिन्त्यदानी ॥
अद्‍भुत हिचे देणे पुरोनि उरते । परि कुणी न्यायाते येत नाही ॥
आई मी टवाळू परि तू मायाळू । तूचि गे कृपाळू करुणाक्षी ॥
योग्या अनिरुद्धी अवघा संपला । वत्सभावे उरला मातेचरणी ॥२३॥
नंदामाई म्हणा नंदामाई म्हणा । हीच विश्वमाता चिदानंदा ॥
साच एक भक्ती सांगतो विश्‍वासे । मातेचिया ध्यासे फोडा टाहो ॥
आईच्या विरहे बाळ जैसे रडे । फोडा हंबरडे उठाउठी ॥
जन्मदात्रीहुनी गुरुमाय वत्सल । धावी सर्वकाळ बाळासाठी ॥
असो मी कसाही माये तुझा बाळ । करी प्रतिपाळ नंदामाई ॥२४॥
नंदामाई म्हणा नंदामाई म्हणा । हीच विश्वमाता चिदानंदा ॥
नाम हीच नाव काळनदीमाजी । घालू नामरुंजी कुंजवनी ॥
तुळशीचे पान नाम वृंदावन । नाम-प्रेमखूण पैंद्‍यापाशी ॥
मुचकुंद आणि कदंबाचे ठायी । नामावीण नाही अन्य दुजे ॥
नामचि गोविद्‍या नाम मधुविद्‍या । अवघी श्रीविद्‍या नंदानामी ॥२५॥
नंदामाई म्हणा नंदामाई म्हणा । हीच विश्वमाता चिदानंदा ॥
नंदामाई माझी गोलोकसम्राज्ञी । श्रीराधा रुक्मिणी प्रेममूर्ती ॥
त्रिपुरसुंदरी त्रिपुरारिभार्या । तीच आदिमाया आदिशक्ती ॥
बापुचे चरण नंदाईच्या हाती । कृपे तिच्या लाभती आम्हांलागी ॥
प्रेम सेवा शरण भक्तीचे लक्षण । दावी साचरण माई आम्हां ॥२६॥
नंदामाई म्हणा नंदामाई म्हणा । हीच विश्वमाता चिदानंदा ॥
एक हिचे ब्रीद मोकले न कोणा । एक हीच जाणा दयामूर्ती ॥
पिली कासवीची जैसे माते पाहती । तैसी होवो भक्ती प्रेमोत्कट ॥
साधण्या साधना धरु एक नाम । घेऊ नंदाराम नाम वाचे ॥
चारही वाणीत एकचि प्रवाह । होवो सारा देह नाममय ॥२७॥

नंदामाई म्हणा नंदामाई म्हणा । हीच विश्वमाता चिदानंदा ॥
नामेचि ताटस्थ नामे शांत आधी । परमसमाधी नामामुळे ॥
नामे चित्तशुद्धी मनाचे सामर्थ्य । अन्य सारा व्यर्थ खटाटोप ॥
नामे सावधता जाणीव जागृती । नामापरि शक्ती अन्य नाही ॥
रामकृष्ण गिविंदा सीता राधा नंदा । हेचि जपा सदा सोपे नाम ॥२८॥
नंदामाई म्हणा नंदामाई म्हणा । हीच विश्वमाता चिदानंदा ॥
नाम नवनीत गरजेची दिशा । नामचि पिपासा अंतर्मुखी ॥
देवयान द्‌वार नाम गुरुद्‌वार । स्मृतीच्या गाभारा नाम हाचि ॥
नामचि अभंग तुकोबाची गाथा । पैंद्‌याची ही गीता नामप्रेम ॥
विद्‌या मकरंदे नामदीक्षा दिधली । ललितानामावली अत्यद्‌भुत ॥२९॥
नंदामाई म्हणा नंदामाई म्हणा । हीच विश्वमाता चिदानंदा ॥
नंदामाईपाठ स्मरे जो उत्कटी । गोवर्धना काठी लावी तोचि ॥
बापुरायबॊटी घालुनी आंगठी । उभी शक्ती पाठी माझी माई ॥
बापुंच्या सर्वत: वामांगी चरणी । सेवा संरक्षणी उभी नंदा ॥
योग्या अनिरुद्धी नंदाईचा लेक । भाव एकी एक अनुभवे ॥३०॥
नंदामाई म्हणा नंदामाई म्हणा । हीच विश्वमाता चिदानंदा ॥